सोनेरी क्षण

सरदार मलिक: संगीतातून विश्वशांतीचा प्रयास



मागच्या पिढीतले संगीतकार म्हणून सरदार मलिक यांचं नाव आघाडीवर होतं. पण आजची पिढी त्यांना ओळखतेय ते आजच्या अनु मलिक या आघाडीच्या संगीतकाराचे वडील म्हणूनच. असं असलं तरी, स्वतः सरदार मलिकजी स्वतःला निवृत्त मानत नाहीत. त्यांच्या संगीतातलं अस्सल काम तर अजून लोकांपुढे यायचंच बाकी आहे असं ते म्हणतात.

□ विजय अकेला

तसं बघायला गेलं तर अवघ्या बावीस चित्रपटांनाच सरदार मलिक यांनी संगीत दिलंय. १९६५मध्ये प्रदर्शित झालेला *पंचरतन* हा त्यांच्या संगीतातला अखेरचा चित्रपट. पण म्हणून काही या संगीतकाराचं काम नगण्य होत नाही. याचं कारण त्यांनी संगीत दिलेली अनेक गाणी आजही लोकांच्या ओठांवर रेंगाळतात. शिवाय स्वतः सरदारसाहेब नुसते संगीतकारच नाहीत, तर ते चांगले गायकही आहेत.

आजची पिढी त्यांना ढब्बू किंवा अनु मलिकचे वडील म्हणून ओळखत असली तरीही त्यांच्या पिढीत ते उत्तम संगीतकार म्हणूनच आजही लोकप्रिय आहेत. 'दीवाना हूं मैं...'(*सारंगा*), 'मैं गरीबों का दिल हूं वतन की जुबां...'(*आबे हयात*), 'अय गम-ए-दिल क्या करूं...'(*ठोकर*) आणि 'मुझे तुम से मोहब्बत है...'(*बचपन*)सारखी अप्रतिम सुमधुर गाणी देणाऱ्या सरदार साहेबांना ही इंडस्ट्री कधी तरी विसरू शकेल का?

'माझ्या जीवनप्रवासाविषयी सांगण्याआधी मला एका गोष्टीचा खुलासा करू द्या. माणूस स्वतःच्या म्हणून बऱ्याच गोष्टी मिरवतो, पण त्यात त्याचं काहीही नसतं. तो ज्या वातावरणातले संस्कार घेऊन मोठा होतो, सगळा त्याचा परिणाम असतो.'

मी मूळचा इस्ट पंजाबचा आहे. १९३४ साली माझा जन्म झाला. माझा गायकमित्र प्रकाश याच्या जोडीने मीही गायला सुरुवात केली. १९४४-४५सालची गोष्ट आहे ही. आमच्या कपूरथला(जन्मगाव)च्या महाराज जगजितसिंग यांनी माझ्या गाण्यावर खूश होऊन मला स्कॉलरशिप दिली आणि उदयशंकर इंडियन कल्चर सेन्टर, आलमोडाला मला शिकायला पाठवलं. तिथे मला अनेक मोठ्या लोकांचा सहवास लाभला. गुरू शंकरन मामोद्री यांच्याकडे कथ्थकली, गुरू पिल्लेंकडे भरतनाट्यम्, गुरू अमोबी सिंग यांच्याकडे मणिपुरीचं शिक्षण घेतलं. पंडित उदयशंकरजी माझे गुरू होतेच. या नृत्यप्रकारांत मी पारंगत झालो होतो. तरीही माझी खरी ओढ होती ती गायकीकडेच. प्रसिद्ध गायक अल्लाऊद्दीन खान आणि श्री विष्णूदास शिराळी यांच्यासारखे महान गुरू मला मिळाले. कवि सुमित्रानंदन पंत यांच्याकडे कविता कशी असते याचे धडे गिरवले. आणखी एक, त्या हॉस्टेलमध्ये माझे रूम पार्टनर कोण होते माहितेय? गुरू दत्त आणि मोहन सहगल. आम्ही आमच्या खोलीत तिघंही असताना अर्धा वेळ गाण्याच्या रियाजात तर उरलेला अर्धा वेळ अभ्यासात घालवत असू. अनेकदा रात्रीपासून पहाटे पाच वाजेपर्यंत आमचं वाचन चाले. कितीतरी पुस्तकं वाचून काढली. त्या पाच वर्षांत मी इतकं ज्ञान संपादन केलं की त्याची काही मोजदादच होऊ शकत नाही. तिथेच मी खऱ्या अर्थाने घडलो असं म्हणायला हरकत नाही. माझ्या मते, संगीत ही दैवी विद्या आहे. तुम्ही त्यात जितके खोल सूर माराल, तुमच्या हाती अधिकाधिक अनमोल खजिना लागेल. उदयशंकर कल्चरल सेंटरचा आमचा ग्रुप सगळ्या देशभर भ्रमण करत असे. त्याच दरम्यान मी मुंबईला आलो. प्रसिद्ध दिग्दर्शक रमेश सहगल यांनी माझा एक कार्यक्रम ऐकला. त्यांना माझा आवाज आवडला आणि लगेच म्हणाले, माझ्या आगामी *रेणुका* या सिनेमाचं संगीत तूच दे. त्यावेळी मी त्यांना सांगितलं की मी एक गायक आहे, संगीतकार नाही. त्यांनी माझं काहीही ऐकून न घेता माझ्यावर संगीताची जबाबदारी सोपवली. १९४७ साली रिलीज झालेल्या *रेणुका*त मुबारक, हेमावती(सप्रुंची पत्नी) आणि शशी कपूर हे कलाकार होते. तो सिनेमा फारसा चालला नाही, तरी माझ्या सुदैवाने गाणी हिट झाली.



संगीतकार पुत्र अनुसह सरदार मलिकः बाप से बेटा सवाई

आणि मग संगीतकार म्हणूनच माझी वाटचाल नकळत सुरू झाली. मी काही फार सधन कुटूंबातून आलेला नव्हतो. मुंबईत राह्यचं तर पैशाची गरजही होतीच. म्हणून मग मी मिळेल ते काम करायची तयारी दाखवली. माझे वडील अब्दुल्ला एक महान चित्रकार होते. ते नेहमी राजे-महाराजे यांची तैलचित्रं रेखाटत.

एखाद्या कलाकाराच्या जीवनाचा बारकाईने अभ्यास करताना मी माझ्या आयुष्याशी त्यांची नकळत तुलना करत असतो. आपल्याप्रमाणे या लोकांनाही संघर्ष चुकलेला नाही ही गोष्ट त्यावेळी माझ्या प्रकर्षाने लक्षात येते. कविश्रेष्ठ सुमित्रानंदन पंत यांनी मला एक गोष्ट समजावली होती. माणसाने काळानुसार स्वतःला बदलायला हवं, असं ते नेहमी म्हणत. त्यांच्या या ओळी मला नेहमीच प्रेरणादायी ठरल्या आहेतः

दीप जलाओ दीप जलाओ
जगमें नया स्वर्णयुग लाओ...

माझे आणखी एक कवि-शायर मित्र होते मजाज. तेही नेहमी म्हणत, मुंबईत कोणीही उपाशी राहात नाही. *ठोकर*मध्ये मी त्यांच्या सुंदर गीताला चाल दिली होती. त्याचे बोल होते,

अय गम-ए-दिल क्या करूं
अय वहशत-ए-दिल क्या करूं
क्या करूं, क्या करूं, क्या करूं...

हे शेवटी मी क्या करूं उगीच तीन वेळा घेतलेलं नाही. ते स्वतः कविता वाचन करताना असं तीन वेळा वाचत असत. त्यांच्या हस्ताक्षरातलं हे गीत आजही माझ्याकडे आहे.

लाहोरच्या कॉलेजला शिकत असताना फैज अहमद फैज यांचीही साथ लाभली. त्या काळात त्यांच्या धर्मियांचे लोक त्यांच्यावर कडक टीका करत असत. पण ते नेहमी मला म्हणत, मलिकसाहब, घाबरू नका. आज मला नावं ठेवणारी लोकच उद्या माझी किंमत कळल्यावर मला डोक्यावर घेतील.

*सारंगा*चे कवि भरत व्यास यांची ही शिकवण बघाः

बीज बोते रहो, बीज बोते रहो, फसल तो होनी ही है.'

आजही मला जगभरातून चाहत्यांची पत्रं आणि फोन येत असतात. मला जे मिळालंय ते जगात क्वचित कोणाला मिळतं. अजूनही जगातल्या

कानाकोपऱ्यातून रॉयल्टी मिळत असते. अर्थात, माझी कित्येक गीतं इतर संगीतकारांनी चोरलीयेत. एका गाण्यासाठी तर मी कल्याणजी-आनंदजींना उघड उघड म्हटलं होतं की, 'चंदन सा बदन, चंचल चितवन...' (*सरस्वतीचंद्र*) हे गाणं माझं होतं. स्वतः मुकेशनीही ही गोष्ट स्वीकारली होती. प्रत्यक्षात ते गाणं अनजान(समीरचे वडील) नी लिहीलेलं होतं. (ही गोष्ट सांगताना ते मूळ बोल गाऊन दाखवतात. 'चंदन सा बदन, चहेरा गुलाब...') हे गाणं विनोद देसाईंसाठी रेकॉर्डही झालं होतं.

मी अनेक गायकांबरोबर काम केलंय. वीणा पानी मुखरजीबरोबर गायलोय तसंच अमीरबाई कर्नाटकींबरोबरही गायलोय. जोहराबाई अंबालावाली आणि एस. बलबीर यांच्याबरोबरही गाण्याची संधी मिळाली. पण अगदी पहिल्या *रेणुका* सिनेमापासून मी एका गोष्टीची खूणगाठ मनाशी बांधली होती. मी रफीसाहेबांसारखं गाईन नाहीतर गाणार नाही. *रेणुका*साठी रफीसाहेबांकडून गीतं गाऊन घेताना माझ्या मनात ही भावना बळावली, तोपर्यंत *रेणुका*ची दोन गीतं माझ्या आवाजात रेकॉर्ड झालेली होती.



बाबूजींसह सरदार मलिकः मैत्रीचे जुळलेले सूर

मी शास्त्रीय संगीत आणि देशी रागदारीबरोबरच बिथोवन आणि मोझार्तसारख्या पाश्चात्त्य कलाकारांबरोबरही काम केलंय.

हसरत जयपुरी यांची बहीण बिलकिस बेगम हिच्याबरोबर माझं लग्न झालं. माझ्या मुलांनी माझं नाव राखलं. अनु आणि डब्बू दोघंही संगीतकार बनलेत. तर अब्बू मलिक संगीतविषयक कार्यक्रमांची निर्मिती-दिग्दर्शन करतो. पूर्वी मी जुहूच्या युनिट कम्पाऊंडमध्ये राहात होतो. त्या ठिकाणी गायक जगमोहन आणि शायर कमर जलालाबादी यांच्यासारखे माझे जुने जिगरी दोस्तही राहात होते.

आजच्या पिढीतल्या संगीतकारांत स्वतःची प्रतिभा पणाला लावून वेगळं संगीत देणारे फार थोडे आहेत. माझा मुलगा म्हणून कौतुक करत नाही, पण आज अनुसारखा वर्सटाईल संगीतकार दुसरा नाही.

पूर्वी मी जेव्हा जेव्हा निराश होत असे तेव्हा माझे गुरू मला एकच गोष्ट सांगत. 'तू तुझी सगळी पूंजी मुलांच्या शिक्षणात गुंतव, तू नक्की जिंकशील.' आणि तसंच झालं. आजवर मी किती चाली लावल्या, संगीत दिलं काही आठवत नाही. पण अनुने त्या सगळ्यांची नोंद ठेवली. त्याला माझ्याविषयी नुसताच आदर नाही तर अभिमानही आहे. अनु म्युझिक इंडस्ट्रीतला सगळ्यात ज़ास्त शिक्षण घेतलेला संगीतकार आहे. त्याने इंग्रजी विषय घेऊन एम.ए. केलंय. माझ्या काळात निर्माता सर्वेसर्वा असायचा. पण आता तर हिरो, हिरॉईन आणि म्युझिक डायरेक्टर्सचं राज्य आहे.

एकटा माणूस या क्षेत्रात काहीही करू शकत नाही. त्याला त्याच्यासारखेच आणखी काही लोक भेटतात तेव्हा सगळे मिळून सुरेख कलाकृतीची निर्मिती करू शकतात. मी आजवर कधी कोणाकडे काम मागायला गेलो नाही. माझ्या अंगी खरोखरच प्रतिभा असेल तर लोक मला शोधत काम घेऊन येतील याची मला खात्री होती.

या इंडस्ट्रीतल्या एक महान गायिका आहेत. मी मुद्दाम नाव सांगत नाही. तर त्यांच्या-माझ्यात मध्यंतरी थोडासा गैरसमजाचा प्रकार झाला होता. मी त्यांची क्षमा मागावी असं अनेकांनी सुचवलं. पण चूक नसताना मी माफी का मागावी? अनेक निर्माते मला सांगत की आम्ही आमच्या सिनेमाचं संगीत तुम्हाला द्यायचा विचार करतोय, पण तुम्ही त्या गायिकेकडून कसं गाऊन घेणार? या एका कारणामुळेही मी अनेक सिनेमे हातचे गमवले.

मला संगीताचा प्रचारक बनायचं आहे. सगळ्या जगाला संगीताची जादू काय आहे ते समजावून द्यायचंय. संगीताच्या माध्यमातून विश्वशांतीचा प्रयत्न करायचाय. माझं खरं काम तर अजूनही लोकांच्या समोर आलेलं नाही. माझ्या आजवरच्या कामाची लोकांनी प्रशंसा केलीय. आता मी वेगळाच प्रयोग करतोय. मोठ्या मोठ्या कविंच्या, शायरांच्या रचना अवघड पण मधुर चालींत बांधतोय. त्या ऐकून लोकांच्या मनातली माणुसकी जागी होईल असा मला विश्वास वाटतोय. मी इतकंच म्हणेन,

'ना जाने लोग इस दुनिया में
नफरत कैसे किया करते हैं,
हमें तो प्यार करने के लिये भी
जिंदगी कम है.'

— सरदार मलिक

सरदार मलिक यांचे गाजलेले चित्रपट

१) *रेणुका*
२) *राज*
३) *ठोकर*
४) *औलाद*
५) *लैला मजनू*
६) *चोर बाजार*
७) *आब-ए-हयात*
८) *चमक चांदनी*
९) *टॅक्सी ५५५*
१०) *मां के आसूं*
११) *मेरा घर मेरे बच्चे*
१२) *सारंगा*
१३) *सुपरमॅन*
१४) *मदन मंजरी*
१५) *पिक पॉकेट*
१६) *बचपन*
१७) *नागज्योति*
१८) *नाग मोहिनी*
१९) *जंतर मंतर*
२०) *महारानी पद्मिनी*
२१) *रूप सुंदरी*
२२) *पंचरतन*

(सरदार मलिक यांनी आपल्या या यादीत *रैन बसेरा* नावाच्या सिनेमाचाही उल्लेख केला पण अशा नावाचा कोणताही सिनेमा पडद्यावर आलाच नाही.

□ शब्दांकनः सी. एम. देसाई